# कौशल्य काही पैलू (भाषा व पोहणे)

भाषा शिक्षणाची सुरवात मूल गर्भात वाढत असल्यापासून होते. गर्भ साधारणपणे चार महिन्यांचा झाल्यावर त्याच्या कानाच्या पेशी तयार होतात. तेंव्हापासून कान ऐकू लागतात. कानावर जे जे पडते, ते मेंदूत नोंदवून ठेवले जाते. डोळे बंद करता येतात. ऐकणे थांबविता येत नाही. मेंदूचा मागचा भाग, पेरीएटल लोब मधील पेशी ऐकण्याचे काम करीत असतात. मेंदूच्या कोणत्या भागात काय काम चालते, हे शोधण्याचे तंत्र आता विज्ञानाने विकसीत केले आहे. कोणतेही काम करीत असताना मेंदूतील कोणत्या भागातील विद्युत चेतना वाढते, याची नोंद आता विज्ञान घेवू शकते. प्री फ्रॉटल लोबमधील काही मज्जापेशी बोलण्याचे काम करतात. विशिष्ट भाषेत बोलता येण्यासाठी त्या भाषेतील स्वर आणि व्यंजने कानावर पडावी लागतात. आजूबाजूला बोलल्या जाणाऱ्या भाषेतील शब्द, त्याचा लहेजा कानावर सतत पडत असतो. कानाच्या पडद्यावर आदळणाऱ्या ध्वनीलहरी नोंदविण्याचे मज्जापेशींचे काम सतत चालू असते. म्हणूनच मुलाला मातृभाषा शिकवावी लागत नाही. स्मृती मेदूच्या नेमक्या कोणत्या भागात शिल्लक ठेवल्या जातात, हे अद्याप समजलेले नाही. पेरीएटल लोब मधे नोंदविण्यात आलेले ध्वनींचे आघात प्री प्रॉटल लोब वापरले जातात. मेंदूतील साऱ्या पेशी एकमेकाशी हवे तेंव्हा जोडून घेवू शकतात. सायनॅप्सिसचे जाळे बालपणी वेगाने वाढत असते. पण जी भाषा ऐकली, ऐकविली जात नाही, ती बोलता मात्र येत नाही. हे सत्य आता मान्य करण्यात आले आहे.



मुलाच्या कानावर भाषा पडलीच नाही, तर ते मूल कोणती भाषा बोलेल? हा प्रयोग पूर्वी कधीतरी करण्यात आला आहे. राजा कोण त्याचे नाव मला स्मरत नाही. पण मुले जन्माला आल्या क्षणी त्याच्या मातेपासून वेगळे करण्यात आली. मुक्या स्त्रियांच्या ताब्यात ती मुले दिली गेली. त्यांच्या कानावर कोणतीही भाषा पडणार नाही, याची व्यवस्था केली गेली. पुढे ही मुले मुकी झाली. कानावर पडणाऱ्या भाषेचा एक कार्यक्रम/प्रोगॅम मेंदूमधे नोंदविला जात असतो. परिचित झालेली ती भाषा, मातृभाषा बोलणे त्यामुळेच पुढे सुलभ होते.

पालक आलींगनाशिवाय बाळाला कोणती महत्वाची देणगी देवू शकतात? बिनभिंतीच्या शाळेत हा प्रश्न पालकांना विचारण्यात आला होता. त्यांना त्याचे उत्तर देता आले नाही. पालकांना एकतर प्रश्न कळला नाही. किवा त्यांनी त्यावर फार विचार केला नाही. त्याचे उत्तर शब्द असे आहे. आपल्याला जे काही आकलन होत असते, ते सारे शब्दांच्या वाटे होते. स्वर आणि व्यंजने यामधून शब्द तयार होतात. जगातील साऱ्या भाषांत एकूण १०० व्यंजने आणि ३२ स्वर वापरले जातात. नोम चोम्स्कीनी यावर काम केले आहे. जे स्वर, व्यंजने कानावर पडत नाहीत, त्यासाठीचे सॉफ्टवेअर न वापरल्याने पुसले जाते. मुलाच्या कानावर फक्त मातृभाषेतील व्यंजने आणि स्वर पडत रहातात. मूल लहान असताना अन्य भाषांतील शब्द त्याच्या पेरीएटल लोब पर्यंत पोचतच नाहीत. परिणामी त्या भाषा त्याला बोलता येत नाहीत. किंवा त्या शिकण्यासाठी त्याला जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात.

या संदर्भातील एक घटना नमूद करुन ठेवावी असे वाटते. साखळकर सर बिनभिंतींच्या शाळेचे संस्थापक

सदस्य होते. हा प्रकल्प आणि भाषाशिक्षणाची अभिनव कल्पना वास्तवात यावी यासाठीच्या संवादात त्यांची भूमिका महत्वाची आहे. सरांची मुलगी अपर्णा तेंव्हा दहा बारा वर्षांची असेल. मुलांना गाणी आवडतात. एक गाणे गुणगुणत ती घरात आली. ''तू म्हणत असलेले गाणे कोणत्या भाषेतील आहे?'' अपर्णाकडे उत्तर नव्हते. ''तू हे कोठे, कसे शिकलीस ?'' सरांचा प्रश्न. ''शेजारचा मुलगा खेळत असताना हे गाणे सतत गुणगुणत असतो.'' अपर्णाचे उत्तर. जे स्वर आणि शब्द कानावर पडतात, त्यांची लय, चाल जर आवडली, तर ते उच्चार कोणी न शिकवितािही शिकले जातात. सरांची एक भाची वर्षा तिचे एका कन्नड मुलाबरोबर लग्न झाले आहे. ती गुजरातमधे रहाते. तिचा मुलगा इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकतो. सात आठ वर्षाच्या या मुलाला मराठी, कन्नड, गुजराती, इंग्रजी भाषा बोलता येतात. या शिकाव्या लागल्या नाहीत. लहानपणी ज्या माणसांच्या सहवासात तूम्ही वावरता, जे शब्द कानावर पडत रहातात, ती भाषा शिकण्यात फारशा अडचणी येत नाहीत. मुलाने ती भाषा बोलावी यासाठी त्याला प्रोत्साहीत करण्याचे काम पालकांनी करायचे असते.

गाण्याच्या माध्यमातून भाषा शिकविता येतील का? साखळकर सरांच्या बोलण्यात हा विषय अनेकवेळा येत असे. गद्य परत परत वाचले किंवा ऐकले जात नाही. पण पद्य / गाणे, त्याची चाल, ठेका छान असेल, तर परतपरत ऐकले जाते. आवडणारी गाण्यांच्या चाल, शब्दांचे रीळ मेंदूत पुन्हःपुन्हा वाजविले जाते. गाणे परतपरत जणीवपूर्वक अनेकवेळा ऐकविता येते. गर्भातील मुलाने काय ऐकावे, हे तर वस्वी पालकांनी ठरावायचे असते. यासाठी हवा असणारा योग्य तपशिल तयार करता येईल. प्रकल्पात तसे प्रयत्न झाले आहेत.

जी भाषा मुलाला यावी असे पालकांना वाटते, त्या भाषेतील गाणी मुलांना ऐकवा. त्या भाषेतील काही कथा कविताही यासाठी निवडता येतील. ती विशिष्ट भाषा सफाईदारपणे बोलणाऱ्या व्यक्तीकडून त्या कथा, कविता रेकॉर्ड करून घेता येतील.

इंटरनेटवरुनही तशा काही कथा कविता मिळू शकतील. मूल गर्भात असल्यापासून हा प्रयोग झाला तर उत्तमच. पण मूल लहान असल्यापासून त्या विशिष्ट भाषेतील गाणी, संवाद, कथा मुलाला ऐकवा. परतपरत ऐकवा. यामधून त्या भाषेतील शब्द त्याच्या कानावर पडतील. त्या शब्दांचा अर्थ मुलाला कळणार नाही. पण उच्चार ऐकला जाईल. प्रत्येकभाषेचा एक वेगळा लहेजा असतो. शब्दांचा उच्चार करण्याची एक पध्दत असते. ही मनात नोंदविली जाईल. पुढे विशिष्ट शब्दाचा अर्थ समजावून देणे सोपे जाईल. मातृभाषेचे व्यकरण मुलाला बालपणी शिकवावे लागत नाही. कानावर जे पडत रहाते, त्यातून मूल भाषा बोलायला शिकते. व्याकरणाचे धडे पुढे देता येतील. पण मुलाची शब्दसंपत्ती वाढत जाईल. परत परत ऐकविल्याने कदाचित काही गाणी, कविता पाठ होतील. शबाचे अर्थ कळावेत यासाठी हेच तंत्र वेगळया पध्दतीने वापरता येईल. परिणामी ती विशिष्ट भाषा शिकणे पुढे सोपे होईल, आनंददायीही होईल.

मूल झोपेतून उठण्याआधी, काही काळ त्याला जे ऐकवाल, ते मूल पटकन आत्मसात करते. झोपेच्या रेम (रॅपिड आय मूव्हमेट) सायकल्स सपल्यानंतर, जाग येण्याआधी काही मिनीटे, जे काही कानावर पडता असते, त्या विषयाचे आकलन पटकन होते. मूल झोपलेले असताना शिकविण्याच्या तंत्रावर जे काम झाले आहे, त्याचा काही तपशिल गुगलवर मिळू शकतो. पाश्चात्य देशातील काही विद्यापीठांतून तसे प्रयोगही झाले आहेत. तसे काही प्रयोग आपल्या देशातही करता येणे शक्य आहे. हे नेमके कसे करायचे याची पध्दत निश्चित करता येईल.

परकीय भाषेतील गाणी मुलांनी म्हणावित असा प्रयत्न बिनभिंतींच्या शाळेत करण्यात आला आहे. वेगळया भाषेतील गाणी म्हणण्यात काय समस्या येतात, याची निरीक्षणेही प्रकल्पात घेतली गेली आहेत. दुर्दैवाने त्या नोंदी आज उपलब्ध नाहीत. पण हे प्रयोग नव्याने करता येतील. आजच्या स्पर्धेच्या युगात दोन तीन भाषा सफाईदारपणे बोलता येणे आवश्यक आहे. या विषयात काम करणारी पुरेशी माणसे न मिळाल्याने हे काम पुढे नेता आले नाही.

बिनभिंतींच्या शाळेला आजच्या शिक्षणचित्रात बदल घडवून आणायचा आहे. भाषा शिकविण्याची अभिनव तंत्रे प्रकल्पाला तयार करायची आहेत. रक्ताचे नाते नसणाऱ्या, पण समान उद्दिष्टे असणाऱ्या व्यक्तींचे एक विशाल कुटुंब उभारण्याचा प्रयत्न प्रकल्पामार्फत केला जात आहे. जर्मन, स्पॅनिश, जपानीसारख्या दोन किंवा जास्त भाषा बोलता येण्याने नोकरी व्यवसायाचे अनेक दरवाजे मुलाला खुले होणार आहेत. मुलाला या भाषा याव्यात असे अनेक पालकांनाही वाटते. मूल घरी राहूनही या भाषा शिकू शकेल. त्याची पध्दत निश्चित करण्याचा प्रयत्न प्रकल्पामार्फत चालू आहे. या उपक्रमात सहभागी होतील, अशा पालकांचा शोध घेण्याचे काम प्रकल्पामार्फत केले जात आहे. भाषा शिकण्या शिकविण्याचे हे तंत्र यशस्वी व्हायला हवे. यासाठी पालकांनी या उपक्रमात मोठ्या प्रमाणावर सहभागी व्हायला हवे. असे घडण्यानेच एका निश्चित कालावधीत हे तंत्र प्रत्यक्षात आणणे शक्य होईल.

फक्त भाषाच नाही, तर अन्य विषयांतील बरेच काही या प्रकारे शिकविणे शक्य आहे.

गाणी कविता, क्था ऐकविण्याच्या प्रयोगांमधून शिकविण्याच्या प्रयोगात किती यश मिळेल, हे आज अचुकपणे सांगता येणार नाही. पण याचे प्रयोग अनेक ठिकाणी व्हायला हवेत. याच्या नोंदी ठेवल्या जाव्यात. त्यानंतरच चाकोरीबाहेरच्या या प्रयोगाचे यशापयश निश्चित करता येईल. असे काम आपल्या देशात व्हावे, असे आपल्यालाही वाटत असेल, असे मानतो.

## तरंगण्याच्या तंत्रातून शिकायचे कसे शिकविता येईल का?

शिक्षण ही माणसाची मूलभूत गरज आहे. जीवनाच्या स्पर्धेत टिकून रहाण्यासाठी शिकावे हे लागतेच. काय शिकायचे हे सभोवतालची परिस्थिती आणि काळ ठरवित असतो. तुम्ही ज्या परिसरात रहाता तेथे टिकून रहाण्यासाठीचे धडे तुम्ही बालपणापासून गिरवित असता.

हे शिक्षण कळत नकळत होत रहाते. समुद्रकिनाऱ्यावर रहाणाऱ्या, मासेमारीचा उद्योग करणाऱ्या कोळ्यांच्या कुटुबात वाढणाऱ्या मुलांना पोहायचे कसे हे शिकवावे लागत नाही. त्यांच्या घरातील होडीवर काम करणारी माणसे, विशेषतः पुरुषांना पाण्यात उडी घ्यावीच लागते.

त्यांच्यासोबत होडीवर जाणारी मुले हे बालपणापासून पहात असतात. पाण्यामधे घाबरण्यासारखे काही नसते, हे आपल्यालाही जमेल, हा संस्कार त्यांच्यावर बालपणातच होत असतो. समुद्र किनाऱ्यालगतच्या प्रदेशात रहाणारी मुले पाण्याशी खेळतच लहानाची मोठी होतात. त्यामुळे ती स्वतःच पोहायला शिकतात. समुद्र किनाऱ्याजवळ मासेमारीचा व्यवसाय करणाऱ्या कुटुंबात, पोहता येत नाही असे मूल अपवादानेच सापडेल. नदीकाठाशेजारी रहाणाऱ्या मुलांबाबत हेच विधान करता येईल. पण शहरांत रहाणाऱ्या मुलांना वाहणाऱ्या किंवा लाटा उसळणाऱ्या पाण्याजवळ खेळण्याची संधी कधीच मिळत नाही.शिकवावे लागत नाही. नदीकाठावर वाढलेल्या मुलांच्या बाबतीतही हेच सत्य आहे. सामान्यपणे नदीच्या जवळपास रहाणारी मुले कोणीही न शिकवता स्वतःच पोहायला शिकतात. समुद्र किनाऱ्याजवळ मासेमारीचा व्यवसाय करणाऱ्या कुटुंबात, पोहता येत नाही असे मूल अपवादानेच सापडेल. नदीकाठाशेजारी रहाणाऱ्या मुलांबाबत हेच विधान करता येईल. पण शहरांत रहाणाऱ्या मुलांना वाहणाऱ्या किंवा लाटा उसळणाऱ्या पाण्याजवळ खेळण्याची संधी कधीच मिळत नाही.

शहराजवळून वाहणारे ओढे किंवा नद्यांची गटारे झाली आहेत. त्यामधे उतरुन खेळणे सोडाच, पण त्यात पाय घालावा असेही वाटत नाही. तुमच्यापैकी किती मुलांना पोहता येत नाही? शहरातून शिकणाऱ्या मुलांना हा प्रश्न विचारा. बरेच हात वर उचलले जातात. पोहता कां येत नाही? पाण्याची भीती वाटते. पोहण्याची संधीच कधी मिळाली नाही. कोणी कधी पोहायला शिकवायचा प्रयत्न केला नाही. सामान्यपणे मुले ही उत्तरे देतात. आपण शिकतो म्हणजे काय करतो? शिकविणे म्हणजे काय? विषयाचा गाभा मुलांपर्यंत नीट पोचायला हवा. यासाठी मुळात शिकायचे कसे हे शिकवावे लागेल. या

विषयावर बिनभिंतींच्या शाळेत नियमित संवाद होत असे. ही गोष्ट जुनी आहे. ज्यांच्यासोबत हे मंथन होत असे, प्रकल्पाचे ते दोनही संस्थापक सहकारी आता हयात नाहीत.

मुलांना जे करायला आवडते, ते मुले न सुचविताही करीत असतात. त्यातून त्याचे शिक्षण घडत रहाते पाण्याशी खेळणे साऱ्या वयोगटातील माणसांना आवडते. वाहणाऱ्या पाण्याचा वापर करुन मुलांना काय व ते कसे शिकविता येईल, यावर प्रकल्पात संवाद झाला. पोहण्याच्या किंबहुना पाण्यात तरंगण्याच्या माध्यमातून बरेच महत्वाचे धडे देता येतील, असे जाणवले. तरंगण्याचे तंत्र फार कमी वेळात शिकविता येईल. हे लक्षात आल्यावर तरंगण्याच्या उपक्रमातून शिकायचे कसे हे शिकविण्याची सुरवात झाली. हे कसे घडत गेले, हे नोंदविण्याचा हा प्रयत्न आहे.

बहुधा हा प्रसंग १९९९ मधील आहे. प्रकल्पात मुंबईतील पस्तीस मुलांचे शिबिर घेतले गेले. मुलांना भरणा नाक्यावरील जगबुडी नदीच्या छोटया बंधाऱ्यावर नेण्यात आले. या बंधाऱ्याजवळ पाणी दोन ते तीन फूट एवढेच खोल आहे. त्यामुळे कोणी बुडण्याची शक्यता नाही. पाण्यात बुडण्याची भीती माणसांना वाटत असते. बुडण्याएवढे पाणी खोल नसल्याने भीतीचा भाग शिल्लक रहात नाही. मुलांना पाण्यात डुंबायला आवडते. पाण्यात खेळावे असे साऱ्यांना वाटत असते. शिकणाऱ्याच्या मनातील तान काढणे जमायला हवे. मुलांनी तुमच्याकडे लक्ष द्यायला हवे. तुम्ही काय सुचवित आहात, हे नीट ऐकायला हवे. मुले रिलॅक्स झाल्यावर पाण्यावर कसे तरंगायचे याचे प्रात्यक्षिक त्यांना दाखविण्यात आले. दोन फूट खोल पाण्यातही ते दाखविता येते. पाण्याच्या पृष्ठभागाशी शरीर समांतर ठेवा. पाण्यात असणारे शरीर पाण्याबरोबर हलत रहाते. हात डोक्याच्या मागे न्या म्हणजे फुफ्फुसात अधिक हवा रहाते. श्वास रोखून धरा. उताणे राहून डोक्याचा मागचा, मानेकडचा भाग पाण्यात बुडवा. तोंड विशेषतः नाक पाण्यावर ठेवण्याचा प्रयत्न करा. पायही उचला. आपण उताणे झोपतो, तसे पाण्यावर शरीराला आडवे ठेवा. सुरवातीला ते जमत नाही. नाका तोंडात जाणारे पाणी नकोसे वाटत रहाते. पण फार थोडया वेळात मुले त्याला सरावतात. शरीर पाण्यावर आडवे ठेवणे सुरवातीला जमत नाही. यासाठी त्यांना कमरेखाली हाताचा आधार द्यावा लागतो. शरीर बऱ्यापैकी स्थिर झाल्यावर आधाराचा हात काढता येतो. श्वास रोखून धरलेला असल्याने फुक्फुसातील जास्तीची हवा पाण्यावर उचलण्यासाठी मदत करीत असते. श्वास सोडल्यावर शरीर पाण्याच्या खाली जावू लागते. श्वास किती वेळ रोखून धरायचा, किती सोडायचा याचे गणित जमायला हवे. शरीर हे पाण्यापेक्षा हलके आहे. फुक्फुसात साठलेली हवा ही फुग्यासारखे काम करीत असते. पाणी शरीराला वर ढकलत रहाते. एकदा श्वासोच्छवासाचे तंत्र समजल्यावर शरीर आपोआपच पाण्यावर तोलले जाते. हे वाचण्यासाठी जेवढा वेळ लागला असेल, त्यापेक्षा कमी वेळात मूल पाण्यात तरंगू शकते. तरंगण्याचे हे तंत्र साऱ्यांना साधते का? सारी मुले काही मिनीटांत पाण्यात तरंगतात का? नाही. प्रत्येकाच्या शिकण्याचा वेग भिन्न असतो शिकण्याची ईच्छा किती तीव्र आहे, यावर शिकण्याचा वेग ठरत असतो. जी मुले दिलेल्या सूचना लक्षपूर्वक ऐकतात, समजून घेतात, आचरणात आणतात, ती काही मिनीटांत पाण्यात तरंगतात. यासाठी अनेकांना जास्तीचा सराव करावा लागतो. काही माणसांना ते कधीच जमत नाही. कारण दिलेल्या सूचना त्यांच्या कानापर्यंत पोचतात. पण अंतर्मनात उतरत नाहीत.

१९९९च्या या बॅचमधील दोन मुले अक्षरशः एका मिनीटांत पाण्यावर तरंगली. त्यांची शरीरे पाण्यावर तरंगत होती. सारी मुले ते पहात होती. त्यांनाही त्यामधे खूप मजा वाटत होती. पण शिकणे म्हणजे काय याचा गाभा त्यांच्यापर्यंत पोहोचला नव्हाता. प्रकल्पावर परत आल्यावर त्यांवर संवाद करण्यात आला. ते तरंगायला शिकले म्हणजे काय हे त्यांना समजावून सांगण्यात आले. साखळकर सर यांनी त्या दोनही मुलांना साऱ्यांसमोर उभे केले. तुम्ही पाण्यावर तरंगत होता, हे आठवा. शिक्षण म्हणजे लक्षपूर्वक ऐकणे किंवा पहाणे, ती माहिती साठविता येणे, हवी तेव्हा आठवता येणे



आणि गरजेप्रमाणे वापरावयास येणे होय. हे समजून घेण्यात मुलांना मजा वाटत होती.साऱ्यांनी पाहीले आहे. तुम्हालाही ते माहीत आहे. तूम्हाला संधी मिळाली तर तुम्ही परत तसे तरंगून दाखवाल का? सरांनी प्रश्न विचारला. दोन्ही मुलांनी त्याला नकार दिला. भिडे सर तेथे शेजारी उभे होते, म्हणून आम्ही तरंगत होतो. ते परत हजर असतील, तर आम्ही निश्चित तरंगू, असे उत्तर त्यांनी दिले. तुम्ही तरंगत होता, तेव्हा काय केलेत ते आठवण्याचा प्रयत्न करा. तुम्हाला दिलेल्या सूचना आठवा. शिक्षण म्हणजे लक्षपूर्वक ऐकणे किंवा पहाणे, ती माहिती साठविता येणे, हवी तेव्हा आठवता येणे आणि गरजेप्रमाणे वापरावयास येणे होय. हे समजून घेण्यात मुलांना मजा वाटत होती.

मूल जेव्हा सायकल शिकते , तेव्हा सुरवातीला त्याच्या सीटच्या मागे हात धरण्यात येतो. हात सोडल्यानंतरही मूल सायकल चालवित रहाते. हात काढून घेतला आहे, हे मुलाला कळल्यावर ते पडते. मनातील भीती त्याला पाडत असते. सायकल शिकण्याची ओढ मनात असते. पण भीती ही जास्त प्रभावी ठरत असते. पुढे सरावाने सायकल शिकता येते. कोणतीही गोष्ट नव्याने शिकताना मला हे जमणार नाही, हे अवघड आहे, हे माझ्या आवाक्यातील नाही, असे विचार मनात येत रहातात. मनात येणारे हे निगेटीव्ह विचार शिकण्याच्या प्रक्रियेत अडथळे निर्माण करीत असतात. हे नकारार्थी विचार पुसणे जमायला हवे. शिकण्यातील मजा कळल्यानंतर शिकणे सोपे असते. शिकण्यासाठीची उत्सुकता मुलाच्या मनात निर्माण करा. शिक्षण आनंददायी असते, याची जाणीव त्याला होवू द्या. विषयाची गोडी त्याला लागायला हवी, यासाठीचे प्रयत्न करा. त्याला शिकण्यासाठीचे प्रोत्साहन द्या. सरावाची सोय करुन द्या. मूल जेथे अडेल, तेथे त्याला सल्ला द्या. मूल त्याच्या वेगाने शिक्त राहील. शिकण्याचा वेग वाढविण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. पण ते करता येतील. बिनभिंतींच्या शाळेत शिकविण्यासाठीची अभिनव तंत्रे शोधण्याचा प्रयत्न केला जातो. या उपक्रमात पालकांचा सहभाग वाढायला हवा. शिकणे ही निरंतर चालत रहाणारी प्रक्रिया आहे. माणूस आयुष्यभर शिक्त असतो. उत्क्रांतीच्या प्रक्रियेत मानवी मेंदू हा शिकण्यासाठीच तयार करण्यात आलेला आहे. वयाबरोबर शिकण्याचे विषय बदलत जातात. पण शिकणे चालू रहाते. शिकणे रंजक व्हावे, आनंददायी व्हावे यासाठी काय करायला हवे, यावर मंथन व्हायला हवे. यासाठी विचारमंथनाची प्रक्रिया सतत चालू रहायला हवी. मनात शिकण्याची तीव्र इच्छा असायला हवी. विशिष्ट विषय शिकण्याची ऊर्मी शिकणे आनंददायी करीत असते. एकलव्याची कथा आपल्याला तेच सुचविते. शिकण्यासाठीची प्रेरणा कशी देता येईल, याचे उत्तर बिनभिंतींच्या शाळेला हवे आहे. या बाबत आपण काही सुचवू शकाल का?

शिक्षणचित्रात बदल व्हावा असे वाटणाऱ्या सदस्यांचा शोध बिनभिंतीची शाळेत घेतला जात आहे. आपणही या अशा चाकोरीबाहेरच्या उपक्रमात सहभागी व्हा, ही विनंती आहे.

◆

**विजय भिडे**
मोबा. ७७०९८७२५६५